## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का-६
नवीन प्रशासकीय इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २०/०३/२०१८

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भातील संबंधित अधिनियमातील तरतुदीमध्ये करण्यात आलेली सुधारणा...

संदर्भ :- महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१/२०१८.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१/२०१८ अन्वये राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमांमध्ये दि.२०/०३/२०१८ रोजी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या दुरुस्तीनुसार राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक २०/०३/२०१८ ते ३०/०६/२०१९ पर्यंत असेल, त्याबाबतीत, राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराकडे वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्याऐवजी जात पडताळणी समितीकडे वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याचा पुरावा व ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत,

पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील याबद्दलचे हमीपत्र नामनिर्देशनपत्रासोबत सादर करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे. अधिनियमाची प्रत सोबत जोडली आहे.

२. वरील परिस्थितीत उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत वैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास त्यांच्याकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये हमीपत्र घेण्यात यावे. यासंदर्भात आवश्यक त्या सूचना संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग

# हमीपत्र

मी श्री / श्रीमती ---------------------------------------------------- (स्वत:चे नाव) श्री.------------------------- वडिलांचे/पतीचे नाव यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी. वय---- वर्षे, राहणार -------------------------------------- (पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो/करते की,

१) मी-------------------------------------------------------------महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ------------- मधून या राखीव जागेकरिता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

२) माझ्याजवळ जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे मी जात पडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत / पडताळणी समितीकडे तसा अर्ज केल्याबाबतचा पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत जोडला असून, जात वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत सादर करण्याबाबतची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

३) निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभागावे रद्द होईल आणि मी महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह / अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

स्थळ :

दिनांक :

माझे समक्ष

निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

RNI No. MAHBIL/2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १४] मंगळवार, मार्च २०, २०१८/फाल्गुन २९, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक २९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.**— मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १—४ |

दिनांक २० मार्च २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २० मार्च २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र **नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्यांच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८, असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियम याच्या सुधारणा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) कलम ५ब मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १८८८ चा ३.

" परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,— २०१८ चा महा. २१.

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

३. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ मधील पोट-कलम (२अ) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

"परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,— २०१८ चा महा. २१.

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या सुधारणा.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) कलम ५ ब मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

" परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या २०१८ चा महा. २१.

दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,--

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मधील, पोट-कलम (१ब) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :-- सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

२०१८ चा महा. २१. "परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

## प्रकरण चार

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या सुधारणा.

१९६५ चा महा.४०. ६. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, (यात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपरिषदा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९अ मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :- सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

२०१८ चा महा. २१. " परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,--

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१-१ब ची सुधारणा.

७. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१ब मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल:-

"परंतु, अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, २०१८ चा महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, महा. २१. २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब ची सुधारणा.

८. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ३४१ब मध्ये, पोट-कलम (४) मध्ये,—

(क) " कलमे ९ " या मजकुरानंतर, ", ९अ " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) " कलम ५१-१क " या मजकुराऐवजी, " कलमे ५१-१क व ५१-१ब " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक १९] मंगळवार, मार्च २०, २०१८/फाल्गुन २९, शके १९३९ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक ३९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 (Mah. Act No. XXI of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXI OF 2018.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 20th March 2018.)*

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Maharashtra Municipal Corporations Act and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965.

III of 1888. LIX of 1949. Mah. XL of 1965.

WHEREAS it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Maharashtra Municipal Corporations Act and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixty-ninth Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

### PRELIMINARY

1. This Act may be called the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018. Short title.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

Amendment of section 5B of III of 1888.

**2.** In section 5B of the Mumbai Municipal Corporation Act (hereinafter referred to as "the Mumbai Municipal Corporation Act"), for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :— III of 1888.

"Provided that, for the General or bye-elections for which the last date of filing of nomination falls during the period commencing on the date of commencement of the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 and ending on the 30th June 2019, in accordance with the election programme declared by the State Election Commission, a person who has applied to the Scrutiny Committee for the verification of his Caste Certificate before the date of filing the nomination papers but who has not received the validity certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,— Mah. XXI of 2018.

(*i*) a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the validity certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and

(*ii*) an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the validity certificate issued by the Scrutiny Committee :".

Amendment of section 37 of III of 1888.

**3.** In section 37 of the Mumbai Municipal Corporation Act, in sub-section (*2A*), for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :—

"Provided that, for the elections for the office of the Mayor for which the last date of filing of nomination falls during the period commencing on the date of commencement of the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 and ending on the 30th June 2019, a person who has applied to the Scrutiny Committee for the verification of his Caste Certificate before the date of filing the nomination papers but who has not received the validity certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,— Mah. XXI of 2018.

(*i*) a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the validity certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and

(*ii*) an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the validity certificate issued by the Scrutiny Committee:".

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

Amendment of section 5B of LIX of 1949.

**4.** In section 5B of the Maharashtra Municipal Corporations Act (hereinafter referred to as " the Maharashtra Municipal Corporations Act"), for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :— LIX of 1949.

" Provided that, for the General or bye-elections for which the last date of filing of nomination falls during the period commencing on the date of commencement of the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Mah. XXI of 2018.

Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 and ending on the 30th June 2019, in accordance with the election programme declared by the State Election Commission, a person who has applied to the Scrutiny Committee for the verification of his Caste Certificate before the date of filing the nomination papers but who has not received the validity certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,—

(*i*) a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the validity certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee ; and

(*ii*) an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the validity certificate issued by the Scrutiny Committee : ".

Amendment of section 19 of LIX of 1949.

**5.** In section 19 of the Maharashtra Municipal Corporations Act, in sub-section (*1B*), for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :—

Mah. XXI of 2018.

"Provided that, for the elections for the office of the Mayor for which the last date of filing of nomination falls during the period commencing on the date of commencement of the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 and ending on the 30th June 2019, a person who has applied to the Scrutiny Committee for the verification of his Caste Certificate before the date of filing the nomination papers but who has not received the validity certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,-

(*i*) a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the validity certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and

(*ii*) an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the validity certificate issued by the Scrutiny Committee:".

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

Mah. XL of 1965.

Amendment of section 9A of Mah. XL of 1965.

**6.** In section 9A of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (hereinafter referred to as " the Municipal Councils Act "), for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :—

Mah. XXI of 2018.

" Provided that, for the General or bye-elections for which the last date of filing of nomination falls during the period commencing on the date of commencement of the Mumbai Municipal Corporation, the

Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 and ending on the 30th June 2019, in accordance with the election programme declared by the State Election Commission, a person who has applied to the Scrutiny Committee for the verification of his Caste Certificate before the date of filing the nomination papers but who has not received the validity certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,—

(*i*) a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the validity certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee ; and

(*ii*) an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the validity certificate issued by the Scrutiny Committee : ".

Amendment of section 51-1B of Mah. XL of 1965.

7. In section 51-1B of the Municipal Councils Act, for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :—

"Provided that, for the elections for the office of the President for which the last date of filing of nomination falls during the period commencing on the date of commencement of the Mumbai Municipal Corporation, the Maharashtra Municipal Corporations and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships (Amendment) Act, 2018 and ending on the 30th June 2019, a person who has applied to the Scrutiny Committee for the verification of his Caste Certificate before the date of filing the nomination papers but who has not received the validity certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,— Mah. XXI of 2018.

(*i*) a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the validity certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and

(*ii*) an undertaking that he shall submit, within a period of six months from the date of his election, the validity certificate issued by the Scrutiny Committee :".

Amendment of section 341B of Mah. XL of 1965.

8. In section 341B of the Municipal Councils Act, in sub-section (*4*),—

(*a*) after the word and figure " section 9 " the figure and letter ", 9A " shall be inserted ;

(*b*) for the word, figures and letter " section 51-1A " the words, figures and letters " sections 51-1A and 51-1B " shall be substituted.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.